International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# “नाशिक जिल्ह्याच्या कृषी विकासात नाबार्डमार्फत करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याचा अभ्यास”

**निलेश भगवान महाजन[१], डॉ. जयश्री पंढरीनाथ जाधव[२]**

*[१]संशोधक विद्यार्थी*

*[२]संशोधक मार्गदर्शक*

*के. आर. टी. आर्ट्स, बी. एच. कॉमर्स अ‍ॅण्ड ए. एम. सायन्स कॉलेज,नाशिक (के. टी. एच. एम. कॉलेज)*

*Corresponding Author – निलेश भगवान महाजन*

**DOI - 10.5281/zenodo.18861435**

**सारांश:**

*भारतीय कृषी क्षेत्र हे देशाच्या सामाजिक व आर्थिक रचनेचा पाया आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने औद्योगिकीकरणाचा मार्ग स्वीकारला असला तरी आजही देशातील मोठ्या लोकसंख्येचे जीवनमान शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील गरिबी निर्मूलन, रोजगारनिर्मिती आणि समावेशक विकास साधण्यासाठी कृषी क्षेत्र सक्षम करणे आवश्यक आहे. या दृष्टीने कृषी पतपुरवठा, सिंचन व्यवस्था, तंत्रज्ञानाचा वापर व संस्थात्मक पाठबळ यांना विशेष महत्त्व आहे. ग्रामीण भारताच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही एक महत्वाची वित्त संस्था आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी नाबार्डमार्फत विविध प्रकारे पतपुरवठा केला जातो. महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्हा हा कृषी व फलोत्पादन क्षेत्रात आघाडीवर असलेला जिल्हा असून द्राक्षे, कांदा, डाळिंब व भाजीपाला उत्पादनासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखला जातो. या संशोधनाचा उद्देश नाशिक जिल्ह्यातील कृषी व कृषीपूरक व्यवसाय यांना नाबार्डमार्फत करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याचा अभ्यास करणे तसेच नाबार्डच्या पतपुरवठ्याची कृषी क्षेत्रातील भूमिका अभ्यासणे हा आहे.*

***बीजशब्द: : कृषी विकास नाबार्ड, नाशिक, कृषी, पतपुरवठा, ग्रामीण विकास***

**प्रस्तावना:**

भारत हा कृषिप्रधान देश असून ग्रामीण भाग हा या देशाचा कणा मानला जातो. ग्रामीण भागाचा समावेश शेती, शेतमजुरी, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि विविध प्रकारच्या लघुवित्त संस्थांमध्ये होतो. ग्रामीण विकासासाठी सक्षम धोरणे, आर्थिक सहाय्य आणि समर्पित संस्था आवश्यक असतात. अशा संस्था व धोरणांचा केंद्रबिंदू म्हणजे राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) होय. नाबार्डची स्थापना १२ जुलै १९८२ रोजी झाली. या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भागातील शाश्वत विकास, कृषी व ग्रामोद्योगांना आर्थिक मदत करणे, विविध योजना राबविणे, सहकारी संस्था व बँकांना कर्ज सुविधा पुरवणे, आणि सामाजिक-आर्थिक विकास घडवून आणणे. नाबार्डने कृषी पुनर्वित्त, पायाभूत सुविधा विकास, आदिवासी सक्षमीकरण आणि वित्तीय समावेशन यांसारख्या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. नाबार्डच्या विविध योजनांमुळे शेतकरी, आदिवासी, महिला व विशेष गटांचा आर्थिक सक्षमीकरण तसेच सामाजिक परिवर्तनास हातभार लागला आहे. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रात नाबार्डने कृषी, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, स्वयं-सहायता बचत गट, शाश्वत शेती, आदिवासी विकास, आणि वित्तीय समावेशन यांसारख्या विविध प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे.

**विषय निवडीचा हेतू :**

महाराष्ट्र राज्यात नाशिक जिल्हा हा कृषी उत्पादन, फलोत्पादन व संलग्न व्यवसायांमध्ये अग्रगण्य आहे. नाशिक जिल्ह्यातील माती, हवामान व भौगोलिक परिस्थिती विविध पिकांसाठी अनुकूल आहे. द्राक्षे व कांदा ही पिके जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानली जातात. यासोबतच पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व रेशीम उद्योग ग्रामीण रोजगार निर्मितीस चालना देतात. तथापि शेतीतील जोखीम, हवामान बदल, शेती क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, साठवणूक क्षमता, बाजारातील अस्थिरता व पायाभूत सुविधांचा अभाव अशा विविध समस्या आजही कायम आहेत. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील कृषी विकास आणि नाबार्डमार्फत करण्यात येणारा पतपुरवठा व नाबार्डचे प्रकल्प यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणून या ठिकाणी "नाशिक जिल्ह्याच्या कृषी विकासात नाबार्डमार्फत करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याचा अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- नाशिक जिल्ह्यात नाबार्डद्वारे करण्यात येणाऱ्या पुनर्वित्त पुरवठ्याचा अभ्यास करणे.
- नाशिक जिल्ह्यात नाबार्डद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा अभ्यास करणे.
- नाशिक जिल्ह्यातील कृषी विकासात नाबार्डची भूमिका समजावून घेणे.

**संशोधनाची गृहीतके :**

अ) नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यातील कृषी व कृषिपूरक व्यवसायांना पतपुरवठा केला जातो.

ब) ग्रामीण भागात नाबार्डमार्फत करण्यात येणारा पतपुरवठा नाशिक जिल्ह्यातील कृषी विकासात महत्त्वाची भूमिका बजावतो.

**संशोधन पद्धती :**

या शोधनिबंधात विश्लेषणात्मक आणि सांख्यिकीय पद्धतीचा वापर केला आहे. संशोधनासाठी लागणारी माहिती मिळविण्यासाठी द्वितीय सामग्रीचा आधार घेऊन माहितीचे तथ्य संकलन करण्यात आले आहे. यामध्ये संदर्भ पुस्तके, नाशिक जिल्हा संभाव्यातायुक्त ऋण योजना, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, प्रकाशित प्रबंध, मासिके, दैनिक वर्तमानपत्रे आणि संकेतस्थळांचा वापर करण्यात आलेला आहे.

**अभ्यास विषयाची मांडणी / स्पष्टीकरण :**

नाशिक जिल्हा, महाराष्ट्राच्या उत्तर भागात वसलेला हा जिल्हा, १५ तालुक्यांत पसरलेला असून एकूण भौगोलिक क्षेत्र १५,५३० चौरस किमी आहे. नाशिक जिल्ह्याचा क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यात तिसरा क्रमांक लागतो. येथील ५७.४७ टक्के लोकसंख्या ग्रामीण असून, जवळजवळ ७७ टक्के लहान मोठे शेतकरी आहेत. नाशिक जिल्हा हा प्रामुख्याने कृषीप्रधान जिल्हा असून येथे शेतकरी पीक उत्पादनापासून दुग्धव्यवसाय, फलोत्पादन, कुक्कुटपालन, कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग इत्यादी विविध कृषी व कृषी संलग्न व्यवसाय करीत आहेत. संपूर्ण देशासाठी कांद्याचा पुरवठा करणारा तसेच कांदा निर्यात करण्याची क्षमता असलेला जिल्हा म्हणून नाशिक जिल्हा ओळखला जातो. तसेच द्राक्षांचा देशातील सर्वात मोठा उत्पादक व निर्यातदार जिल्हा म्हणूनही नाशिक प्रसिद्ध आहे. धान्य पिकांमध्ये भात, बाजरी, गहू, मका तसेच सोयाबीनसारख्या तेलबियांमध्येही नाशिक जिल्हा आघाडीवर आहे. द्राक्षांव्यतिरिक्त डाळिंब, पेरू, आंबा यांसारख्या फळपिकांमध्येही जिल्हा अग्रणी आहे. सुरगाणा व पेठ तालुक्यांमध्ये स्ट्रॉबेरीची यशस्वी लागवड होत आहे. टोमॅटो, मिरची, वांगी, काकडी, फुलकोबी, कोबी व

शिमला मिरची यांसारख्या भाज्यांची लागवड चांदवड, सिन्नर, इगतपुरी, सुरगाणा व पेठ तालुक्यांमध्ये केली जाते. जिल्ह्याची शेजारील तसेच मध्यपूर्व देशांमध्ये भाजीपाला निर्यातही वाढत आहे.

**नाशिक जिल्ह्यात नाबार्डने केलेला पतपुरवठा :**

नाबार्डने नाशिक जिल्ह्यात शेती व शेतीशी संबंधीत अन्य लघु उद्योग, कुटीरउद्योग यांना पतपुरवठा व्यापारी बँक, राज्य सहकारी बँक, क्षेत्रीय ग्रामीण विकास बँक यांच्या माध्यमातून पुनर्वित्ताच्या साहाय्याने केला आहे. नाशिक जिल्ह्यात नाबार्ड मार्फत पुढीलप्रमाणे पतपुरवठा करण्यात आला आहे.

**तक्ता क्र.१ नाबार्डचा नाशिक जिल्ह्यातील बँकानुसार वितरीत केलेला पतपुरवठा** (रु.लाख)

| वर्ष | व्यापारी बँक | राज्य सहकारी बँक | क्षेत्रीय ग्रामीण बँक | एकूण |
|---|---|---|---|---|
| **२०२०-२१** | ७८६८७१.४३ | ४८२८२.२० | ७४२२.२८ | **८४२५७५.९१** |
| **२०२१-२२** | १३२६१०८.०० | ४६६२२.०० | ७८७२.०० | **१३८०६०२.००** |
| **२०२२-२३** | १८२२१९०.०० | ४८२१७.०० | ७९३२.०० | **१८७८३३९.००** |
| **२०२३-२४** | २३७३०४२.०० | ४५९०४.०० | १४५३२.०० | **२४३३४७८.००** |
| **एकूण** | | | | **६५३४९९४.९१** |

(स्रोत : नाशिक जिल्हा – संभाव्यता ऋण योजना २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४)

वरील तक्त्यात सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीमधील नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यातील व्यापारी बँक, राज्य सहकारी बँक आणि क्षेत्रीय ग्रामीण बँक मिळून वितरीत करण्यात आलेल्या पतपुरवठ्याची आकडेवारी येथे दिलेली आहे. यामध्ये सन २०२०-२१ मध्ये वरील बँका मिळून ८,४२,५७५.९१ लाख रुपये एवढा, सन २०२१-२२ मध्ये १३,८०,६०२ लाख रुपये एवढा, सन २०२२-२३ मध्ये १८,७८,३३९ लाख रुपये एवढा, तर सन २०२३-२४ मध्ये २४,३३,४७८ लाख रुपये एवढा पतपुरवठा वितरीत केला आहे. सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये वरील विविध बँका मिळून एकूण ६५,३४,९९४.९१ लाख रुपये एवढा पतपुरवठा करण्यात आला आहे.

**कृषी क्षेत्रातील विविध घटकांसाठी नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास करण्यात येणारा पतपुरवठा :**

पीक कर्ज, जलसंपदा, भू-विकास, कृषी यांत्रिकीकरण, वृक्षलागवड व फळबागा, पशुपालन, मत्सपालन, पशुसंवर्धन, गोदाम आणि बाजारपेठा, गैर कृषी क्षेत्र, स्वयंसहाय्यता समूह, कृषी चिकित्सालय आणि कृषी व्यवसाय, वनीकरण, अन्नप्रक्रिया व्यवसाय, प्रशिक्षण अशा विविध कृषी क्षेत्रातील घटकांच्या विकासासाठी नाबार्ड पतपुरवठा करते. त्यातील काही प्रमुख घटकांची माहिती पुढीलप्रमाणे देता येईल.

**पीक कर्ज :**

नाशिक जिल्ह्यात विविध पिकांचे व फळांचे उत्पादन केले जाते तसेच त्या पीक उत्पादनावर विविध उद्योग व व्यवसाय अवलंबून आहेत. या विविध पिकांच्या उत्पादनासाठी नाबार्ड शेतकऱ्यांना पीक कर्ज देते. नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास करण्यात येणारा पीक कर्जासाठीचा पतपुरवठा सन २०२०-२१ मध्ये ३,१८,३८६.१२ लाख रुपये करण्यात आला. तो सन २०२१-२२ मध्ये घटून २,३६,१८४.१४ लाख रुपये इतका लाख झाल्याचे दिसते. मात्र २०२२-२३ मध्ये तो परत वाढून ३,०५,६१२.४५ लाख रुपये एवढा करण्यात आला.

**जलसंपदा :**

नाशिक जिल्हा मध्यम पर्जन्यमान क्षेत्रात येतो. सरासरी वार्षिक पर्जन्यमान १०७४ मिमी आहे. जिल्ह्यात ०७ मोठे व ०९ मध्यम सिंचन प्रकल्प आहेत तसेच १३४ लघु सिंचन प्रकल्प आहेत. विविध विहिरी, पाझर तलाव, बंधारे व इतर सिंचन स्रोतही आहे. या जलसंपदा क्षेत्राला नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास करण्यात येणारा पतपुरवठा सन २०२१-२२ मध्ये ६३,०६५.३३ लाख रुपये केला गेला. सन २०२२-२३ मध्ये तो वाढून ६४,२१३.०९ लाख रुपये एवढा करण्यात आला.

**कृषी यांत्रिकीकरण :**

कृषी यांत्रिकीकरण म्हणजे शेतीमध्ये यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाचा वापर करून जमीन व श्रम उत्पादकता वाढवणे होय. वेळेवर कामकाज, यंत्रांचा कार्यक्षम वापर, उत्पादनाची गुणवत्ता सुधारणा, शेतकऱ्यांची सुरक्षितता व सोय, उत्पादनातील नुकसान व कष्ट कमी करणे तसेच हवामान बदलाशी लढण्यास मदत करणे हे याचे उद्दिष्ट आहे. मजूर खर्च जास्त असल्यामुळे अनेक पिकांचा उत्पादन खर्च वाढलेला आहे. सध्याच्या परिस्थितीत मजुरांची टंचाई व वाढती अन्नधान्य मागणी लक्षात घेता कृषी यांत्रिकीकरण अत्यावश्यक झाले आहे. या क्षेत्रासाठी नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास करण्यात येणारा पतपुरवठा २०२०-२१ मध्ये २,२२७.९० लाख रुपये होता, तर २०२२-२३ मध्ये २,३४७.६० लाख रुपये एवढा करण्यात आला.

**लागवड व फलोत्पादन :**

नाशिक जिल्हा हा फलोत्पादन पिकांचा प्रमुख उत्पादक असून राज्यातील एकूण फलोत्पादन क्षेत्राच्या १८ टक्के व उत्पादनाच्या १६.७६ टक्के हिस्सा जिल्ह्याचा आहे. येथील माती व हवामान डाळिंब, द्राक्षे, पेरू, आंबा, बोर, स्ट्रॉबेरी, पपई, आवळा इत्यादी कोरडवाहू व बागायती पिकांसाठी अनुकूल आहे. कांदा हेही प्रमुख पीक असून सटाणा, देवळा, सिन्नर, चांदवड व मालेगाव तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. फलोत्पादनाव्यतिरिक्त जिल्ह्यात रेशीम उद्योगही प्रसिद्ध आहे. हा उपक्रम लहान व मध्यम शेतकऱ्यांसाठी रोजगारनिर्मितीचा महत्त्वाचा स्रोत आहे. चांदवड, निफाड व सिन्नर तालुक्यांमध्ये सुमारे ३ टन कोष उत्पादन होते. या क्षेत्रासाठी नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास करण्यात येणारा पतपुरवठा सन २०२१-२२ मध्ये ५,१९३.५६ लाख रुपये होता, तो २०२२-२३ मध्ये वाढून ५,३७२.६४ लाख रुपये एवढा करण्यात आला.

**पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन :**

पशुसंवर्धन क्षेत्र ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. दुष्काळ व पूर यांसारख्या परिस्थितीत पीक नुकसान झाल्यास उत्पन्नाचा धोका कमी करण्यास हे क्षेत्र मदत करते. दुग्धव्यवसाय हा जिल्ह्यातील प्रमुख पूरक व्यवसाय असून ग्रामीण गरीबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतो. या क्षेत्रासाठी नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास करण्यात येणारा पतपुरवठा सन २०२१-२२ मध्ये ८,६९६.६४ लाख रुपये होता, तो सन २०२२-२३ मध्ये वाढून ८,९७४.४३ लाख रुपये करण्यात आला. कुक्कुटपालन हा महत्त्वाचा संलग्न व्यवसाय असून व्यावसायिक तसेच घरगुती पातळीवर करता येतो. यामुळे ग्रामीण गरीबांना पूरक उत्पन्न व पोषण सुरक्षा मिळते. या क्षेत्रासाठी नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास करण्यात येणारा पतपुरवठा सन २०२०-२१ मध्ये १,५००.०६ लाख रुपये होता, तो सन २०२१-२२ मध्ये वाढून ३,५५३.३४ लाख रुपये करण्यात आला.

**साठवण व विपणन पायाभूत सुविधा :**

यामध्ये गोदामे, बाजारपेठा, कोल्ड स्टोरेजयांचा समावेश होतो. ता क्षेत्रासाठी नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास करण्यात येणारा पतपुरवठा सन २०२०-२१ मध्ये ९८७.३५ लाख रुपये होता, तो सन २०२१-२२ मध्ये ६६४.७७ लाख रुपये व २०२२-२३ मध्ये ५११.९४ इतका करण्यात आला.

**कृषी पायाभूत सुविधा :**

यामध्ये जमीन विकास, मृदसंवर्धन व पाणलोट विकास यांचा समावेश होतो. या क्षेत्रासाठी नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास करण्यात येणारा पतपुरवठा सन २०२१-२२ मध्ये २,८३६.१९ लाख रुपये होता, तो सन २०२२-२३ मध्ये २,४३२.४७ लाख रुपये करण्यात आला.

**नाबार्ड समर्थित प्रकल्प व त्यांचा परिणाम :**

नाबार्ड ही कृषी व ग्रामीण विकास क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असून सक्षम व आर्थिकदृष्ट्या समावेशक ग्रामीण भारत उभारण्याचे कार्य करते. विकासात्मक उपक्रम, विविध पुनर्वित्त उत्पादने व ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी वित्तपुरवठा करून नाबार्डने महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. शेतकरी उत्पादक संघटना (FPO), पाणलोट विकास, आदिवासी विकास (वाडी मॉडेल) व नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन यांसारख्या उपक्रमांद्वारे नाबार्ड शाश्वत व समावेशक विकासाला चालना देत आहे. खालील तक्त्यामध्ये नाशिक जिल्ह्यात नाबार्डच्या सहाय्याने राबविण्यात आलेल्या प्रकल्प व हस्तक्षेपांची माहिती दिली आहे.

**नाबार्ड समर्थित प्रकल्प व त्या प्रकल्पांचा प्रकल्प असणाऱ्या भागांवर होणारा परिणाम**

| अनु. क्र. | नाबार्डद्वारे समर्थित प्रकल्प | परिणाम / प्रभाव |
|---|---|---|
| १ | पाणलोट प्रकल्प :<br>इगतपुरी तालुक्यातील इंदोरे, वासळी, खेड व आधारवड येथे नाबार्ड व महिंद्रा (CSR अंतर्गत) अर्थसहाय्यित प्रकल्प.<br>इगतपुरी तालुक्यातील भारविर व अडसरे येथे नाबार्ड अर्थसहाय्यित प्रकल्प.<br>चांदवड तालुक्यातील कोकणखेडे व दरेगाव येथे नाबार्ड अर्थसहाय्यित प्रकल्प. | या हस्तक्षेपांमुळे प्रकल्पग्रस्त तसेच आसपासच्या गावांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढेल. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त पिके घेता येतील व गावांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. तसेच या भागात पतउपयोग (credit off take) वाढण्यासही हातभार लागेल. |
| २ | हवामान बदल अनुकूलन प्रकल्प :<br>इगतपुरी तालुक्यातील बारशिंगवे, सोनोशी, धनाशी येथे नाबार्ड व महिंद्रा अर्थसहाय्यित प्रकल्प.<br>सिन्नर तालुक्यातील हिवरे, आडवाडी, धोंडबार येथे नाबार्ड अर्थसहाय्यित प्रकल्प. | हे हस्तक्षेप पाणलोट प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राबविण्यात आले आहेत. या प्रकल्पांच्या पूर्णतेनंतर गावांमध्ये हवामान-सुरक्षित (climate proofing) व हवामान-स्मार्ट शेती पद्धती दीर्घकालीन स्वरूपात स्वीकारल्या जातील. |
| ३ | सुरगाणा, पेठ व दिंडोरी तालुके येथील फळबाग विकास (वाडी) प्रकल्प | या तीन तालुक्यांमध्ये राबविण्यात आलेल्या वाडी प्रकल्पांत निवडलेल्या शेतकऱ्यांना १ एकर डोंगराळ क्षेत्रामध्ये ४० केशर आंबा व २० काजू रोपांची लागवड करून देण्यात आली आहे. तसेच सागवान व इतर फळझाडांच्या रोपांनी सीमांकन करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना दीर्घकालीन उत्पन्नाची संधी उपलब्ध होऊन गावांमधून होणारे स्थलांतर रोखण्यास महत्त्वाची भूमिका बजावली जाते. |

| | | |
|---|---|---|
| ४ | शेतकरी उत्पादक संघटनांचा (FPO) प्रसार : नाबार्डच्या उत्पादक संस्था विकास निधीअंतर्गत. १०,००० FPO प्रोत्साहनासाठी केंद्रीय क्षेत्र योजनेअंतर्गत. | नाशिक जिल्ह्यात नाबार्डने उत्पादक संस्था विकास योजनेअंतर्गत २३ FPO व केंद्रीय क्षेत्र योजनेअंतर्गत ०९ FPO स्थापन केले आहेत. या FPO मार्फत तांत्रिक मार्गदर्शन, विपणन, प्रक्रिया, पीक निविष्ठा व इतर कृषी सेवा पुरविल्या जातात. त्यामुळे शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न वाढले असून निविष्ठा व कृषी सेवा, संस्थात्मक वित्तपुरवठा, विपणन सुविधा तसेच शेती कार्यक्षमता सुधारली आहे. |

**गृहीतकांची तपासणी :**

अ) नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यातील कृषी व कृषिपूरक व्यवसायांना पतपुरवठा केला जातो असे गृहीत धरले आहे. नाशिक जिल्ह्यात नाबार्डमार्फत विविध बँकांद्वारे केलेला पतपुरवठा आणि विविध उद्दिष्टांसाठी नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यास कृषी क्षेत्रास करण्यात येणारा पतपुरवठ्याच्या अभ्यासावरून दिसते की नाबार्ड कृषी व कृषीपूरक व्यवसाय यांना पुनर्वित्ताच्या माध्यमातून आर्थिक साहाय्य करते तसेच विविध कृषी विकासासाठी आवश्यक घटकांना वित्तपुरवठा करून नाशिक जिल्ह्यातील कृषी विकासास पोषक वातावरण निर्माण करते. थोडक्यात नाबार्डमार्फत नाशिक जिल्ह्यातील कृषी व कृषिपूरक व्यवसायांना पतपुरवठा केला जात असल्याचे दिसून येत आहे. थोडक्यात पहिल्या क्रमांकाचे गृहीत सत्य ठरले आहे.

ब) संशोधनासाठी दुसरे गृहीत ग्रामीण भागात नाबार्डमार्फत करण्यात येणारा पतपुरवठा नाशिक जिल्ह्यातील कृषी विकासात महत्त्वाची भूमिका बजावतो असे मांडण्यात आले आहे. नाशिक जिल्ह्यास नाबार्डमार्फत करण्यात येणारा पतपुरवठा, जिल्ह्यातील कृषी क्षेत्रांच्या विकासासाठी आवश्यक विविध घटकांना नाबार्डमार्फत केलेला पतपुरवठा आणि नाबार्ड समर्थित प्रकल्प व त्या प्रकल्पांचा प्रकल्प असणाऱ्या भागांवर होणारा परिणाम यांच्या अभ्यासातून दिसून येते की नाबार्ड ग्रामीण भागात पतपुरवठ्याच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यातील कृषी विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. थोडक्यात दुसऱ्या क्रमांकांचे गृहीत सत्य ठरले आहे.

**निष्कर्ष :**

संशोधन अभ्यासावरून नाशिकच्या कृषी विकासात नाबार्डचे महत्वाचे योगदान असल्याचे दिसून आले. नाशिक जिल्ह्यातील नाबार्डमार्फत विविध उद्दिष्टे व क्षेत्रांसाठी केलेल्या पतपुरवठ्याच्या अभ्यासावरून असे दिसते की नाशिकच्या ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रात कार्यरत लोकांची आर्थिक स्थिती सुधारून जीवनमानाची पातळी उंचावली आहे तसेच जिल्हातील प्रादेशिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे. नाबार्ड ग्रामीण भागात पतपुरवठ्याच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यातील कृषी विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

**संदर्भ :**

1. कविमंडन विजय, ‘ कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र’, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.(२०१२)
2. नीता वाणी, ‘कृषी अर्थशास्त्र’, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव. (२०१५)
3. बेरळीकर प्रमोद, ‘ग्रामीण विकास’, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद. (२०२२)
4. नाशिक जिल्हा – संभाव्यतायुक्त ऋण योजना २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४.
5. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२२.
6. बालवाड रमेश, ‘नाशिक जिल्हा विशेषांक’, विद्याभारती प्रकाशन.
7. https://www.nabard.org/EngDefault.aspx.